आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता
२१ जुलै २०२५ -सोम वार

**<u>ठळक बातम्या</u>**

- देशाच्या लोकशाहीला बळकट करण्यासाठी उपयुक्त चर्चा संसदेच्या अधिवेशनात होईल अशी आशा प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्याकडून व्यक्त

- पहलगाम दहशतवादी हल्ल्यासह विविध मुद्द्यांवरून सरकारला घेरत विरोधकांची घोषणाबाजी, लोकसभेचं कामकाज दोन वाजेपर्यंत तहकूब

- मुंबईत लोकल रेल्वेगाड्यांमध्ये २००६मध्ये झालेल्या बॉम्बस्फोट प्रकरणातील सर्व आरोपींची सबळ पुराव्याअभावी निर्दोष मुक्तता

**आणि**

- फिडे महिलांच्या बुद्धिबळ विश्वचषक स्पर्धेत कोनेरू हम्पीची उपांत्य फेरीत धडक, ही कामगिरी करणारी कोनेरू पहिली भारतीय खेळाडू

**<><><><>**

संसदेच्या पावसाळी अधिवेशनाला आजपासून सुरुवात झाली. २१ ऑगस्टपर्यंत हे अधिवेशन चालणार आहे.

देशाच्या लोकशाहीला बळकट करण्यासाठी उपयोगी पडेल अशी चर्चा या अधिवेशनात होईल, अशी आशा प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी व्यक्त केली. पावसाळी अधिवेशन सुरू होण्याआधी संसद भवन परिसरात ते आज वार्ताहरांशी बोलत होते. हे अधिवेशन देशासाठी अभिमानाचा क्षण असून आपल्या सामूहिक यशाचा विजयोत्सव आहे, असं प्रधानमंत्री म्हणाले.

सर्व जग भारताच्या लष्करी सामर्थ्याचं साक्षीदार बनलं असून हे पावसाळी अधिवेशन विजयोत्सव आहे असं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केलं. पहलगाम इथल्या दहशतवादी हल्ल्याच्या सूत्रधारांची घरं ऑपरेशन सिंदूरमधे २२ मिनिटात जमीनदोस्त करण्यात आली, ऑपरेशन सिंदूर अंतर्गत भारतीय लष्कराने आपलं उद्दिष्ट शंभर टक्के पूर्ण केलं असं प्रधानमंत्री म्हणाले.  या विजयी अधिवेशनात सर्व सभागृह एका सुरात बोलेल तेव्हा लष्कराचं मनोधैर्य वाढेल, नागरिकांना प्रेरणा मिळेल आणि संरक्षण संशोधन, नवोन्मेष आणि

उत्पादन क्षेत्राला चालना मिळेल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. भारतीय अर्थव्यवस्था वेगाने वाढत असून तिसऱ्या क्रमांकाकडे झेप घेत आहे, असं प्रधानमंत्री म्हणाले.

**- - होल्ड - बाईट - पीएम - -**

देशातला नक्षलवाद मुळापासून उखडून टाकण्याच्या दिशेनं संरक्षण दलाची वाटचाल सुरू आहे. शेकडो नक्षलग्रस्त जिल्हे आता स्वतंत्र झाले आहेत, असं प्रधानमंत्र्यांनी सांगितलं.

अधिवेशनाचं कामकाज सुरळीत चालावं यासाठी सर्व पक्षांच्या खासदारांनी सहकार्य करावं अशी विनंती प्रधानमंत्र्यांनी यावेळी केली. सर्वांनी देशहितासाठी एकत्र काम करावं, असं आवाहन त्यांनी केलं.

**<><><><>**

जनतेच्या आकांशा व्यक्त करण्यासाठी आणि राष्ट्रहित जपण्यासाठी संसदेच्या सर्व सदस्यांची सामूहिक भूमिका महत्त्वाची असल्याचं लोकसभेचे सभापती ओम बिर्ला यांनी समाजमाध्यमावरल्या पोस्टद्वारे म्हटलं आहे. पावसाळी अधिवेशनाचं कामकाज सुरळीत चालावं यासाठी सर्व पक्षांच्या खासदारांनी सहकार्य करावं असं आवाहन बिर्ला यांनी केलं. सर्वसमावेशक विकास, सामाजिक न्याय आणि आर्थिक विकासासाठी ठोस पावलं उचलण्यासाठी सर्व खासदारांनी रचनात्मक चर्चा आणि संवाद करावा, असं ते म्हणाले. हे अधिवेशन अर्थपूर्ण आणि यशस्वी होईल अशी आशा बिर्ला यांनी व्यक्त केली.

**<><><><>**

लोकसभेत प्रश्नोत्तरांचा तास सुरू झाल्यानंतर विरोधी पक्षांच्या सदस्यांनी पहलगाम दहशतवादी हल्ल्यासह विविध मुद्द्यांवरून सरकारला घेरत घोषणाबाजी सुरू केली. त्यामुळे सभागृहाचं कामकाज आधी दुपारी बारा आणि नंतर दोन वाजेपर्यंत तहकूब करण्यात आलं. चर्चेचा अजेंडा ठरवण्यासाठी सल्लागार समितीची बैठक दुपारी अडीच वाजता होणार आहे, असं संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांनी सांगितलं. सरकार सर्व विषयांवर चर्चा करण्यासाठी तयार आहे, मात्र विरोधी पक्षाचे सदस्य हौद्यात उतरून निदर्शनं करत आहेत, हे चूक आहे, असं रिजिजू म्हणाले.

लोकसभेचं आजचं कामकाज सुरू झाल्यानंतर आठ दिवंगत सदस्यांना आदरांजली वाहण्यात आली. तसंच पहलगाम दहशतवादी हल्ला आणि अहमदाबाद विमान अपघातात

मरण पावलेल्यांनाही आदरांजली वाहण्यात आली. विविध राज्यात नैसर्गिक आपत्तीत जीव गमावलेल्या आणि आर्थिक हानी झालेल्यांप्रती सभागृहाने सहवेदना व्यक्त केली. आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकावरल्या यशस्वी प्रवासासाठी लोकसभेचे अध्यक्ष ओम बिर्ला यांनी कॅप्टन शुभांशु शुक्ला यांचं अभिनंदन केलं.

**<><><><>**

एका सशक्त लोकशाहीत द्वेषाला काही जागा नसून देशात कोणताही पक्ष देशहिताला विरोध करत नाही असं राज्यसभेचे अध्यक्ष जगदीप धनखड राज्यसभेत म्हणाले. राजकीय पक्षांच्या सदस्यांनी एकमेकांशी सौहार्द आणि आदराने वागावं, आणि अशोभनीय भाषेचा वापर टाळावा असं आवाहन त्यांनी केलं.

त्याआधी राज्यसभेत निवडून आलेल्या दोन आणि राष्ट्रपती नियुक्त तीन सदस्यांना राज्यसभेचे अध्यक्ष जगदीप धनखड यांनी शपथ दिली. तसंच राज्यसभेच्या सात दिवंगत सदस्यांना आदरांजली वाहण्यात आली. प्रश्नोत्तरांचा तास सुरु झाल्यानंतर विरोधी पक्षाच्या सदस्यांनी घोषणाबाजी सुरू केल्यामुळे सभागृहाचं कामकाज दुपारी बारा वाजेपर्यंत तहकूब करण्यात आलं.

**<><><><>**

सरकार विरोधी पक्षांच्या सदस्यांना सभागृहात बोलू देत नाही असा आरोप लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी केला. संसद भवन परिसरात ते वार्ताहरांशी बोलत होते. सभागृहात केवळ मंत्र्यांनाच बोलण्याची परवानगी आहे, विरोधी पक्षाच्या सदस्यांना नाही असं ते म्हणाले.

**<><><><>**

मुंबईत लोकल रेल्वेगाड्यांमध्ये २००६मध्ये झालेल्या बॉम्बस्फोट प्रकरणातल्या सर्व १२ आरोपींना सबळ पुराव्याअभावी आज विशेष न्यायालयाने निर्दोष मुक्त केलं.

या १२ पैकी पाच आरोपींना फाशीची शिक्षा, तर उर्वरित आरोपींना जन्मठेपेची शिक्षा सुनावण्यात आली होती. न्यायालयाने या सर्व आरोपींबाबतचा सत्र न्यायालयाचा निकाल रद्द करून त्यांची तातडीनं सुटका करण्याचे आदेश दिले. या घटनेत प्रत्यक्षदर्शी साक्षीदार, घटनास्थळ आणि आरोपींकडून हस्तगत केलेलं साहित्य तसंच, कबुलीजबाब या तिन्ही पातळीवर आरोपींविरुद्धचा एकही गुन्हा सिद्ध करण्यात तपास यंत्रणा अपयशी ठरल्याचं

न्यायाधीश अनिल किलोर आणि श्याम चांडक यांच्या पीठाने या निकालावेळी स्पष्ट केलं. या प्रकरणातल्या एकाही साक्षीदाराची साक्ष विश्वसनीय नसल्याचं निरीक्षणही न्यायालयाने नोंदवलं.

मुंबईत ११ जुलै २००६ रोजी लोकल गाड्यांमध्ये सात साखळी बॉम्बस्फोट झाले होते. या बॉम्बस्फोटांमध्ये १८९ जण मृत्युमुखी पडले, तर ७०० हून अधिक जण जखमी झाले. तर अनेकजण आयुष्यभरासाठी जायबंदी झाले. या खटल्यात विशेष मकोका न्यायालयानं सप्टेंबर २०१५ मध्ये १२ जणांना दोषी ठरवलं होतं.

<><><><>

भारताकडून इलेक्ट्रॉनिक वस्तूंच्या निर्यातीत या आर्थिक वर्षांच्या पहिल्या तिमाहीत ४७ टक्के वाढ झाली आहे. वाणिज्य मंत्रालयाने दिलेल्या माहितीनुसार या निर्यातीपैकी ६० टक्केहून अधिक निर्यात अमेरिकेला झाली. त्यानंतर भारतातून संयुक्त अरब अमिरातीला आठ टक्के आणि चीनला चार टक्के इलेक्ट्रॉनिक मालाची निर्यात झाली. याशिवाय भारतातून  तयार कपड्यांची निर्यात अमेरिकाला सर्वाधिक झाली आहे. संयुक्त अरब अमिराती, जर्मनी आणि स्पेनला त्याखालोखाल निर्यात झाली.

<><><><>

जॉर्जियात बटुमी इथे सुरू असलेल्या फिडे महिलांच्या बुद्धिबळ विश्वचषक स्पर्धेत भारतीय खेळाडू कोनेरू हम्पी हिने उपांत्य फेरी गाठली आहे. या स्पर्धेची उपांत्य फेरी गाठणारी हम्पी ही पहिली भारतीय महिला खेळाडू ठरली आहे. या स्पर्धेच्या उपांत्यपूर्व सामन्यात हम्पीने चीनच्या साँग युक्सिन हिला पराभूत केलं.

<><><><>

जम्मू काश्मीरच्या किश्तवाड जिल्ह्यात दाट जंगलात लपलेल्या दहशतवाद्यांचा शोध अभियान सुरक्षा दलाने रात्रभराच्या स्थगितीनंतर आज सुरु केलं . हिजबुल मुजाहिदीन संघटनेचे दोघे जण तसंच ज्यांच्यावर तीस लाखांचं बक्षिस आहे असे दोन अतिरेकी अशा चौघांसाठी पोलीस आणि लष्कराची संयुक्त कारवाई सुरु आहे.

//<><><><>//